भारतीय पोलीस सेवेतील
अधिकाऱ्याची बदलीने पदस्थापना.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्रमांकः आयपीएस-१५१६/प्र.क्र.१२/पोल-१**
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
तारीख: - ७ जानेवारी, २०१६

**वाचा:**- शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११९/विशा-३ अ, दिनांक-५.१.२०१६

**प्रस्तावना:-**

राज्यात वाढत असलेल्या सायबर गुन्हयांवर प्रभावीपणे आळा घालण्याकरीता राज्य शासन आणि पोलीस यंत्रणेमध्ये सायबर गुन्हयांच्या संदर्भात अधिक परिणामकारक सुसुत्रता आणण्याकरीता आणि सायबर गुन्हयांच्या शोध घेण्यामध्ये कायमस्वरुपी समन्वय करण्यासाठी, शासन निर्णय, गृह विभाग दि. ५.१.२०१६ अन्वये पुणे येथील पोलीस उपमहानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग हे पद विशेष पोलीस महानिरीक्षक ( महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे ) या पदावर श्रेणी उन्नत करुन कार्यालयासह मुंबई येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. सदर पदावर भारतीय पोलीस पोलीस सेवेतील अधिका-याची पदस्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश : -**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२न(२) च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खाली नमूद केलेल्या भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्याची त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | श्री. ब्रिजेश सिंह, | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य अन्वेषण अभिलेख, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | विशेष पोलीस महानिरीक्षक, ( महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर गुन्हे ) मुंबई. |

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१०७१३०६१६१८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: CN = Charushila Chandrakant Tambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Joint Secretary
Date: 2016.01.08 11:56:34 +05'30'

**( चारुशीला तांबेकर )**
**सह सचिव, गृह विभाग**

प्रत,

१. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस आयुक्त, मुंबई/पुणे

३. विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार व सायबर गुन्हे विभाग, मुंबई

४. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य अन्वेषण अभिलेख विभाग, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ / २, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.

६. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. सह सचिव (आस्थापना), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१०.अ.मु.स.(गृह) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

११.प्रधान सचिव (अ. व सु.) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२.प्रधान सचिव (विशेष) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३.संबंधित अधिकारी.

१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१५.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे .

१६.सहाय्यक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७.निवड नस्ती, पोल-१